Exh. U-227

**द्वितीय पक्ष क. 1 चा उलटतपास : प्रथम पक्षातर्फे श्री. पराग पी. शहाणे वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरू :**

2. हे म्हणणे खरे आहे की, प्रथम पक्ष ही महाराष्ट्र ग्रामिण बॅंक अशा नावाची बरोबर बॅंक आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रथम पक्ष महाराष्ट्र ग्रामिण बॅंक ही रिजनल रूरल बॅंक ॲक्ट (आर.आर.बी. ॲक्ट, 1976) अन्वये निर्माण झालेली बॅंक आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रथम पक्ष बॅंकेचे संचालक मंडळ हे आर. आर. बी. कायद्याप्रमाणे स्थापीत झालेले असते. हे म्हणणे खरे आहे की, प्रथम पक्ष बॅंक ही 20/07/2009 रोजीं अस्तित्वात आलेली आहे व बॅंकेचे मुख्य कार्यालय औरंगाबाद येथे आहे. बॅंकेचे मुख्य कार्यालय 2009 ला नांदेड येथे होते व 2014 साली मुख्य कार्यालय औरंगाबाद येथे स्थापीत केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रथम पक्ष बॅंक अस्तित्वात येण्यापुर्वी त्या बॅंकेचे महाराष्ट्र गोदावरी ग्रामिण बॅंक व मराठवाडा ग्रामिण बॅंक या बॅंक अस्तित्वात होत्या. दि. 20/07/2009 साली महाराष्ट्र गोदावरी ग्रामिण बॅंक व मराठवाडा ग्रामिण बॅंकचे विलीनीकरण प्रथम पक्ष बॅंकेमध्ये झालेले आहे. महाराष्ट्र गोदावरी ग्रामिण बॅंकेचे मुख्य कार्यालय औरंगाबाद या ठिकाणी होते. औरंगाबाद जालना ग्रामिण बॅंकेचे मुख्य कार्यालय औरंगाबाद येथे होते. मराठवाडा ग्रामिण बॅंकचे मुख्य कार्यालय नांदेड येथे होते. ठाणे ग्रामिण बॅंक व औरंगाबाद जालना ग्रामिण बॅंक या बॅंकेचे एकत्रीत महाराष्ट्र गोदावरी ग्रामिण बॅंक तयार झालेली आहे. ठाणे ग्रामिण बॅंकेचे मुख्य कार्यालय ठाणे येथे होते. हे म्हणणे खरे आहे की, महाराष्ट्र ग्रामिण बॅंक अस्तित्वात येण्यापुर्वी पुर्वीच्या बॅंकांचे संचालक मंडळ हे वेगवेगळे होते. संचालक मंडळामध्ये रिझर्व्ह बॅंकेचे जनरल मॅनेजर, बॅंक ऑफ महाराष्ट्र चे डेप्युटी जनरल मॅनेजर व नाबार्डचे डेप्युटी जनरल मॅनेजर हे संचालक मंडळामध्ये असतात. संचालक मंडळांच्या बैठका मुख्य कार्यालयामध्ये अथवा जेथे त्यांना योग्य वाटेल तेथे होतात. मीं कोणत्याही बॅंकेच्या संचालक मंडळावर संचालक म्हणून कार्यरत नाहीं. हे म्हणणे खरे आहे कीं, संचालक मंडळाच्या मिटींगमध्ये माझा सहभाग नसतो. हे म्हणणे खरे आहे कीं, संचालक मंडळाच्या मिटींगमध्ये माझा सहभाग नसल्यामुळे मला मिटींगमध्ये

काय घडते त्याबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, संचालक मंडळाच्या मिटींगमध्ये माझे अनुमोदन अथवा सुचक म्हणून सहभाग नसतो.

3. युनियनचे तथाकथीत कागदपत्र मी बॅकेला कधी दिले त्याची मी तारिख सांगू शकत नाही. मी युनियनचे तथाकथीत कागदपत्र बॅकेला स्वतः दिलेले आहेत. मी युनियनकडे दिलेल्या तथाकथीत कागदपत्रांवर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, दुय्यम पुरावा म्हणून दाखल केलेले कागदपत्र खोटे तयार केलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दुय्यम पुरावा म्हणून दाखल केलेले कागदपत्र माझेसमोर तयार केलेले नाहीत. दुय्यम पुराव्यातील युनियनच्या काही कागदपत्रांवर माझे सहया आहेत व काही कागदपत्रांवर भारतीय मजदूर संघाचे सचिव यांच्या सहया आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दुय्यम पुराव्यातील बाकीचे कागदपत्र बॅकेच्या संदर्भात आहेत त्यावर माझे सहया नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दुय्यम पुराव्यासाठी दाखल केलेले कागदपत्र खोटे व बनावट दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दुय्यम पुराव्याचे कागदपत्र आमच्या केसला मदत व्हावी म्हणून खोटे व बनावट तयार केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी मला लाभ मिळावा म्हणून खोटे शपथपत्र दाखल केलेले आहे.

उलटतपास : संपुर्ण.

फेरतपास : काही नाही. **श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2026.02.02 13:30:15 +0530

**(द. शं. खेडेकर)**
दिनांक–31/01/2026 प्र. न्यायाधीश,
कामगार न्यायालय क. 2 औरंगाबाद